कुर्ल्यातील नेहरूनगरमध्ये मोठ्या प्रमाणात म्हाडा इमारतीचा पुनर्विकास झाला आहे. अद्यापही विविध बांधकामे सुरू आहेत. त्यामुळे झाडांसाठी जागा उरलेली नाही. तसेच, विकासकामांसाठी पूर्वीच अनेक झाडांवर कुऱ्हाड चालविण्यात आली आहे. त्यामुळे या भागात हिरवळ निर्माण व्हावी, यासाठी येथील नागरिक प्रयत्न करीत आहेत. त्यातच बीकेसी प्रकल्पाला दिलेली मदर डेअरीची जागा आता धारावी पुनर्विकास प्रकल्पाला देण्यात आल्यामुळे नागरिकांमध्ये असंतोष पसरला आहे. तसेच, या प्रकल्पासाठी परिसरातील ९०० झाडे कापण्याचे प्रस्तावित असून या वृक्षतोडीला नागरिकांकडून विरोध होत आहे. संबंधित जागेतील झाडांचा हिरवळीचा भाग सोडल्यास सगळीकडे इमारती उभ्या राहिल्या आहेत. त्यामुळे शासनाने प्रस्तावित वृक्षतोडीचा निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी स्थानिक रहिवाशांकडून करण्यात येत आहे.

जागतिक आरोग्य संघटनेनुसार, मुंबईतील हवेचे प्रदूषण मर्यादेपेक्षा १० पट जास्त आहे. झाडे कमी झाल्यास हा धोका आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे वृक्षतोड रोखण्यासाठी कुर्लावासीयांनी लोकचळवळही उभारली असून त्याद्वारे मोर्चे काढण्यात आले, आंदोलने करण्यात आली. तसेच, आता वृक्षतोडीविरोधात स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येत आहे. वृक्षतोडीचा निर्णय मागे घेण्याबाबत लोकचळवळ फाऊंडेशनचे संस्थापक किरण पैलवान लवकरच न्यायालयात याचिका दाखल करणार आहेत.



परिसरात उद्यान उभारण्याची मागणी

गेल्या दीड वर्षापासून परिसरात उद्यान उभारण्यासाठी सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरावा करीत आहोत. मात्र, अद्यापही मागणी मान्य झालेली नाही. झाडे आणि शहर एकत्र वाढू शकतात, हे सिंगापूर शहराने दाखवून दिले आहे. हरित क्षेत्राशिवाय विकास म्हणजे पुढच्या पिढ्यांचे भवितव्य धोक्यात घालण्यासारखे आहे, असे लोकचळवळ फाऊंडेशनचे संस्थापक किरण पैलवान यांनी सांगितले.

In Kurla's Nehru Nagar, citizens strongly oppose cutting 90 trees for the Dharavi redevelopment project on Mother Dairy land. Locals demand a park instead, highlighting rising pollution and loss of greenery. Activists, led by Kiran Palwan, plan court action and ongoing protests to protect the environment.

Loksatta • 04 Jun • Dharavi

A bounty of concessions for 'Dharavi

1,2 • PG	192 • Sqcm	112046 • AVE	272.51K • Cir	Middle Center,Top Center

Pune

'धारावी'साठी सवलतींची खैरात

कुर्ल्यातील डेअरीच्या २१ एकर जागेच्या वापराबाबत अटी शिथिल; अदानींना आणखी किती जमीन देणार; मंत्रिमंडळ बैठकीत विचारणा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी दुग्धव्यवसाय विकास विभागाची कुर्ला येथील सुमारे २१ एकर (८.५ हेक्टर) जमीन देताना त्याच्या वापराबाबत अटी-शर्ती शिथिल करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंगळवारी घेण्यात आला. आतापर्यंत सुमारे ५५० एकर जमीन धारावीच्या पुनर्वसनासाठी देण्यात आली असताना अदानी समूहाला आणखी किती जागा देणार, असा सवाल मंत्रिमंडळाच्या बैठकीत काही ज्येष्ठ मंत्र्यांनी विचारला. त्यावर जमीन अदानींना नव्हे, तर धारावीकरांच्या पुनर्वसनासाठी देत आहोत. सरकारची बदनामी *(पान २ वर)*



सवलती काय?

- कुर्ला येथे २१ एकरांमध्ये वाघरण्यात येणाऱ्या घरांच्या बांधकामाचे विकास हस्तांतरण हक्क (टीडीआर) विक्रीसाठी म्हाडाऐवजी अदानी रियल्टीला
- जागेचा वापर व्यावसायिक कारणांसाठीही करण्याची मुभा
- वांद्रे पूर्वेतील रहिवाशांच्या पुनर्वसनासाठी जास्तीत जास्त घरे उपलब्ध
- घाटकोपरमधील अपात्र नागरिकांच्या पुनर्वसनाचा मार्ग मोकळा होणार असल्याचा दावा

आतापर्यंत दिलेली जमीन

- मिठागर : २५५ एकर
- मढ : १४० एकर
- देवनार कचराभूमी : १२४ एकर
- कुर्ला डेअरी : २१ एकर
- एकूण : ५५० एकर



'धारावी'साठी सवलतींची खैरात

(पान १ वरून) होणार नाही याची सर्वांनी खबरदारी घ्यावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्याचे समजते. धारावी पुनर्विकासासाठी कुर्ल्यातील २१ एकर जमीन देण्याचा धोरणात्मक निर्णय यापूर्वीच घेण्यात आला होता. जमीन देताना घालण्यात आलेल्या सर्व अटी व शर्ती शिथिल करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. अजून किती जमीन धारावीकरांसाठी देणार, असा सवाल राष्ट्रवादीच्या काही ज्येष्ठ मंत्र्यांनी उपस्थित केल्याची माहिती सूत्रांनी दिली. अदानी कंपनीला मोक्याची जमीन देण्यात येत असल्याने सरकारबद्दल जनतेच्या मनात नाराजीची भावना असल्याचा सूर उमटला. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, जमीन राज्य सरकारच्याच धारावी पुनर्विकास प्रकल्प- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास देत आहोत. हा जगातील सर्वांत मोठा पुनर्वसन प्रकल्प असून यातील अपात्र साडेतीन लाख लोकांचे मुंबईतच पुनर्वसन केले जाणार आहे. त्यासाठी जागेची गरज असून कुर्ला व अन्य ठिकाणी ज्या जमिनी देण्यात आल्या आहेत, तेथे या लोकांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. त्यांना भाड्याने ही घरे दिली जाणार असून १२ वर्षांनंतर ही घरे त्यांच्या मालकीची होतील. ही वस्तुस्थिती असताना मुंबईतील जमिनी अदानीला दिल्या जात असल्याचा कांगावा करीत सरकारची बदनामी केली जात आहे. या प्रकल्पाबाबत लोकांमध्ये चुकीची माहिती जाणार नाही, याची अधिकारी आणि सर्वांनी खबरदारी घ्यावी, अशा सूचना फडणवीस आणि शिंदे यांनी केल्याचे खात्रीलायक सूत्राने सांगितले. दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या कुर्ला येथील मातृदुग्धशाळेची जमीन प्रकल्पाचे नियोजन प्राधिकरण म्हणून काही अटी व शर्तींवर धारावी पुनर्विकास प्रकल्प- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला प्रदान करण्यात आली आहे. प्रकल्प राबविणे अधिक सुलभ व्हावे यासाठी जागेच्या वापराच्या अटी व शर्तींमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय मंगळवारी घेण्यात आला.

The Maharashtra Cabinet relaxed rules for using 5 acres in Kurla for Dharavi redevelopment, granting the Adani Group commercial rights through Transfer of Development Rights (TDR). Concerns remain about how much land and housing will be allocated to Dharavi residents versus commercial interests in the project.

Navshakti • 04 Jun • Dharavi

Adani takes over Mother Dairy

1 • PG | 217 • Sqcm | 43575 • AVE | 419.55K • Cir | Top Left
Mumbai

मदर डेअरीची जागा अदानींना

धारावीतील अपात्र कुटुंबांचे पुनर्वसन कुर्ल्यात **शाळा, रुग्णालय, शॉपिंग कॉम्प्लेक्सचा समावेश**

राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी



मुंबई : धारावी पुनर्विकास प्रकल्पाला गती प्राप्त झाली असून साडेआठ लाख कुटुंबांपैकी पात्र ५ लाख कुटुंबीयांचे धारावीत पुनर्वसन करण्यात येणार आहे, तर उर्वरित अपात्र कुटुंबीयांचे मुलुंड, देवनार, कुर्ला येथे पुनर्वसन करण्यात येणार आहे. यासाठी कुर्ला पूर्व येथील मदर डेअरीची ८.५ हेक्टर जमीन अदानी समूहाला हस्तांतरित करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत याला मंजुरी देण्यात आली आहे. दरम्यान, याठिकाणी शाळा, रुग्णालय व शॉपिंग कॉम्प्लेक्स अशा सोयीसुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत.

दुग्ध व्यवसाय विकास विभागाच्या कुर्ला, पूर्व येथील मातृ दुग्धशाळेची जमीन धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी १४ जून २०२४ च्या शासन प्रस्तावानुसार प्रदान करण्यात आली आहे. या प्रकल्पाचे नियोजन प्राधिकरण म्हणून ही जमीन काही अटी-शर्तींवर धारावी पुनर्विकास प्रकल्प-झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना प्रदान करण्यात आली आहे.

हा प्रकल्प राबविणे अधिक सुलभ व्हावे यासाठी या प्रस्तावातील आणि जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या मसुदा करारनाम्यातील अटी व शर्ती गृहनिर्माण आणि नगरविकास विभागाच्या धोरणाशी सुसंगत करण्यास मान्यता देण्यात आली. जेणेकरून धारावीतील रहिवाश्यांच्या पुनर्वसनासाठी जास्तीत जास्त घरे उपलब्ध होऊ शकणार आहेत. धारावी पुनर्विकासात साडेआठ लाख कुटुंबांचे पुनर्वसन करावे लागणार आहे. यापैकी पाच लाख पात्र कुटुंबांचे पुनर्वसन धारावी परिसरात पुनर्वसन होणार आहे. उर्वरित साडेतीन लाख कुटुंबांचे पुनर्वसन करण्यासाठी अधिकची जमीन गरजेची असल्याने राज्य सरकारने हा निर्णय घेतला आहे.

'सर्वांसाठी घरे' धोरणाचे पालन

कुर्ला येथील जमीन उपलब्ध झाल्याने आणखी काही कुटुंबांचे पुनर्वसन करणे सुलभ होणार आहे. मंत्रिमंडळाच्या या निर्णयामुळे धारावीतील अपात्र नागरिकांच्या पुनर्वसनाचा मार्ग मोकळा होणार आहे. 'सर्वांसाठी घरे' या धोरणाचे पालन करताना हा निर्णय अत्यंत महत्वपूर्ण असून, केवळ घरेच नाही, तर शाळा, रुग्णालये, शॉपिंग कॉम्प्लेक्स अशा इतरही नागरी सुविधांचे निर्माण सुलभ होणार आहे.

The Maharashtra cabinet approved transferring 1.5 hectares of Kurla's Mother Dairy land to the Dharavi redevelopment project, led by Adani group. This will aid rehabilitation of 8.5 lakh families, with 5 lakh in Dharavi and others in Mulund, Deonar, and Kurla, alongside schools, hospitals, and shopping complexes.

Navshakti • 04 Jun • Dharavi

Allegations on master plan stem from ignorance – Shewale

2 • PG | 46 • Sqcm | 9341 • AVE | 419.55K • Cir | Middle Left

Mumbai



मास्टर प्लॅनवरील आरोप अज्ञानातून - शेवाळे

मुंबई : धारावी पुनर्विकासाच्या मास्टर प्लॅनबाबत सुरू असलेले आरोप हे अपुरी माहिती आणि विरोधकांच्या अज्ञानातून होत असल्याची टीका माजी खासदार राहुल शेवाळे यांनी केली आहे. एक्स समाज माध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये शेवाळे यांनी, स्वार्थी राजकारण, अपप्रचार यांना मागे टाकून धारावीकरांचे स्वप्न साकार करण्यासाठी महायुती सरकार कटिबद्ध असल्याची ग्वाहीदेखील त्यांनी दिली.

विरोधकांनी संपूर्ण माहिती घेऊन मगच प्रतिक्रिया द्यावी, असा सल्ला त्यांनी दिला. राजकीय उदासीनतेमुळे काँग्रेस सरकारच्या काळात रखडलेल्या धारावी पुनर्विकास प्रकल्पाला महायुती सरकारने केलेल्या प्रयत्नांमुळे वेग येत असताना पुन्हा या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात खोडा घालण्याचे काम विरोधी पक्षांकडून सुरू असल्याची टीका शेवाळे यांनी केली.

Former MP Rahul Shewale criticized opposition's ignorance and allegations against the Dharavi redevelopment master plan. On social media, he said the Mahayuti government is committed to progress, accusing opposition of selfish politics and propaganda. Shewale urged protesters to seek full information before reacting and praised Mahayuti for advancing the stalled project.

Nav Rashtra • 04 Jun • Dharavi

Big relief for Dharavi project victims

3 • PG | 181 • Sqcm | 299293 • AVE | 500.5K • Cir | Middle Left
Mumbai

राज्यमंत्रिमंडळ निर्णय • अपात्र नागरिकांच्याही पुनर्वसनाचा मार्ग आता मोकळा

धारावी प्रकल्पग्रस्तांना मोठा दिलासा

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी दुग्ध व्यवसाय विकास विभागाची कुर्ला येथील ८.५ हेक्टर जमीन हस्तांतरित करण्यासाठी करारनाम्यातील अटी, शर्तींमध्ये सुधारणांना मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. धारावीचा पुनर्विकास करताना प्रत्येक पात्र स्थानिकाला तिथेच घर हे सरकारचे आश्वासन आहे. आताच्या या निर्णयामुळे धारावीतील अपात्र नागरिकांच्याही पुनर्वसनाचा मार्ग मोकळा झाला आहे. धारावीचा पुनर्विकास करताना कोणावरही अन्याय होऊ देणार नाही असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे.

दुग्ध व्यवसाय विकास विभागाच्या कुर्ला येथील मातृदुग्धशाळेची जमीन धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी १४ जून २०२४ च्या निर्णयानुसार प्रदान करण्यात आली आहे. या प्रकल्पाचे नियोजन प्राधिकरण म्हणून ही जमीन काही अटी व शर्तींवर धारावी पुनर्विकास प्रकल्प- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना प्रदान करण्यात आली आहे. कुर्ला येथील जमीन उपलब्ध झाल्याने आणखी काही कुटुंबांचे पुनर्वसन करणे सुलभ होणार आहे, अशी माहिती बैठकीमध्ये देण्यात आली आहे.



प्रकल्प राबविणे आता अधिक सुलभ होणार

मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्प राबविणे अधिक सुलभ व्हावे यासाठी या ज्ञापनातील आणि जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या मसुदा करारनाम्यातील अटी व शर्ती गृहनिर्माण आणि नगरविकास विभागाच्या धोरणाशी सुसंगत करण्यास मान्यता देण्यात आली. यामुळे प्रकल्पाला आता गती मिळणार आहे. प्रकल्पबाधितांचाही प्रश्न मिटणार असून त्यांच्या पुनर्वसनाचा मार्ग मोकळा होणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

पाच लाख पात्र कुटुंबांचे धारावीतच पुनर्वसन

धारावीतील रहिवाश्यांच्या पुनर्वसनासाठी जास्तीत जास्त घरे उपलब्ध होऊ शकणार आहेत. धारावी पुनर्विकासात साडे आठ लाख कुटुंबांचे पुनर्वसन करावे लागणार आहे. यापैकी पाच लाख पात्र कुटुंबाचे पुनर्वसन धारावी परिसरात पुनर्वसन होणार आहे. उर्वरित साडे तीन लाख कुटुंबांचे पुनर्वसन करण्यासाठी अधिकची जमीन गरजेचे आहे. कुर्ला येथील जमीन उपलब्ध झाल्याने आणखी काही कुटुंबांचे पुनर्वसन करणे सुलभ होणार आहे. अपात्र नागरिकांच्या पुनर्वसनाचा मार्ग मोकळा होणार आहे. सर्वांसाठी घरे या धोरणाचे पालन करताना हा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण असून, केवळ घरेच नाही, तर शाळा, रुग्णालये, शॉपिंग कॉम्प्लेक्स अशा इतरही नागरी सुविधांचे निर्माण सुलभ होईल.

The state cabinet approved transferring 1.5 hectares of Kurla land for Dharavi redevelopment, easing rehabilitation of 3.5 lakh ineligible families beyond the 5 lakh eligible ones. This decision supports the project's implementation, providing homes and civic amenities like schools, hospitals, and shopping complexes for residents.

Lokmat • 04 Jun • Dharavi

Changes in Kurla land transfer terms

2 • PG | 364 • Sqcm | 364372 • AVE | 604.7K • Cir | Top Left

Mumbai

कुर्ला जमीन हस्तांतरणाच्या अटींमध्ये बदल

राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय : करारनाम्यातील सुधारणांमुळे धारावी पुनर्वसन प्रकल्पात मिळणार अधिक घरे

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी दुग्ध व्यवसाय विकास विभागाची कुर्ला येथील ८.५ हेक्टर जमीन हस्तांतरित करण्यासाठी करारनाम्यातील अटी, शर्तींमध्ये सुधारणांना मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

ही जमीन धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी १४ जून २०२४ च्या शासन निर्णयानुसार प्रदान करण्यात आली आहे. ही जमीन काही अटी व शर्तींवर धारावी पुनर्विकास प्रकल्प- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना प्रदान करण्यात आली आहे. हा प्रकल्प राबविणे अधिक सुलभ व्हावे यासाठी या निर्णयातील आणि जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या मसुदा करारनाम्यातील अटी व शर्ती गृहनिर्माण आणि नगरविकास विभागाच्या धोरणाशी सुसंगत करण्यास मान्यता देण्यात आली.



साडेतीन लाख कुटुंबांचे पुनर्वसन करण्यासाठी

धारावी पुनर्विकासात साडे आठ लाख कुटुंबांचे पुनर्वसन करावे लागणार आहे. यापैकी पाच लाख पात्र कुटुंबाचे पुनर्वसन धारावी परिसरात होणार आहे. उर्वरित साडे तीन लाख कुटुंबांचे पुनवर्सन करण्यासाठी अधिकची जमीन गरजेचे आहे. कुर्ला येथील जमीन उपलब्ध झाल्याने आणखी काही कुटुंबांचे पुनर्वसन सुलभ होईल.

The state cabinet approved changes in the Kurla land transfer terms to support the Dharavi Rehabilitation Project. This reform facilitates rehousing 3.5 lakh additional families beyond the 5 lakh rehabilitated within Dharavi. The land provided under government conditions will ease the project's implementation and family rehabilitation.

Lokmat • 04 Jun • Dharavi

We want a house in Dharavi, that too 500 feet

2 • PG | 156 • Sqcm | 155674 • AVE | 604.7K • Cir | Top Center

Mumbai

आम्हाला घर धारावीतच हवे तेही ५०० फुटांचे

धारावीकरांचा पुनरुच्चार; कुर्ला येथे जाण्यास विरोध

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : धारावी पुनर्विकास प्रकल्पावरून रान उठले असून, समर्थक व विरोधकांमधील शीतयुद्ध शमण्याची चिन्हे नाहीत. त्यात आता धारावीसाठी कुर्ला येथील जमिनीलाही मान्यता मिळाली असतानाच विरोधकांनी मात्र धारावी सोडणार नसल्याचा चंग बांधला आहे. पुनर्विकास करायचा असेल तर धारावीतच करा आणि ५०० फुटांचे घर धारावीतच द्या, या मागणीचा धारावीकरांनी पुनरुच्चार केला आहे.

धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी कुर्ला येथील दुग्ध व्यवसाय विकास विभागाची ८.५ हेक्टर जमीन हस्तांतरित करण्यासाठी करारनाम्यातील अटी, शर्तींमध्ये सुधारणांना मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता मिळाली आहे. यावर धारावी बचाव आंदोलनाचे समन्वयक ॲड. राजेंद्र कोरडे यांनी सांगितले की, धारावीकरांची एकच मागणी आहे ती म्हणजे पुनर्वसन धारावीतच झाले पाहिजे. मात्र, सरकार कुर्ला किंवा इतर जमिनी धारावीच्या नावाखाली अदानीला देत आहे.

आंदोलनाचे नेते बाबूराव माने यांच्या म्हणण्यानुसार, आम्ही सरकारचा डाव यशस्वी होऊ देणार नाही. कोणत्याच निर्णयात आम्हाला सहभागी करून घेतले जात नाही. सरकारने कुठल्याही जमिनी दिल्या तरी आम्ही धारावी सोडणार नाही.

शिंदे यांनी केलेल्या घोषणेचे काय झाले?

मुंबई काँग्रेस अध्यक्ष खा. वर्षा गायकवाड यांनी सांगितले, कुर्ल्यातील मदर डेअरीची जागा अदानीला देण्यास स्थानिक लोकांसह काँग्रेसचाही विरोध आहे. धारावीकरांचे पुनर्वसन धारावीत करायचे आहे तर मग एवढ्या मोठ्या प्रमाणात जमिनी अदानीला का दिल्या जात आहेत? एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांच्या पक्षाच्या स्थानिक आमदाराने मदर डेअरीची जागा अदानीला देणार नाही, असे जाहीर केले होते. मग, आता काय झाले, याचे उत्तर त्यांनी दिले पाहिजे. स्थानिकांच्या मागणीकडे सरकारने दुर्लक्ष केले असले तरी त्याविरोधातला लढा थांबणार नाही.

Dharavi redevelopment faces strong opposition as locals demand 3-foot houses for residents. Despite Kurla land transfer approval to Adani, protesters refuse to leave Dharavi. Leaders and Congress question the government's decision, accusing it of ignoring promises and locals' demands, vowing to continue their fight against the project.

Prahar • 04 Jun • Dharavi

Dharavi will be saved from hell...

8 • PG | 246 • Sqcm | 68974 • AVE | 215K • Cir | Top Center
Mumbai

धारावीची नरकातून सुटका होणार...

महाराष्ट्र सरकारने धारावी पुनर्विकास प्रकल्पचा मास्टर प्लॅन मंजूर केला आणि धारावीतील रहिवाशांच्या आशा पल्लवीत झाल्या. आपल्याला हक्काचे घर मिळणार, घरातच संडास-बाथरूम असणार, धारावीतील रस्ते स्वच्छ, रुंद व सुंदर असणार, शाळा, बगीचे, दवाखाने, समाज मंदिर, सभागृह, दुकाने, बाजारपेठा, प्रसूतीगृह, सर्वकाही योजनाबद्ध असणार असे स्वप्न रंगवले जात आहे. धारावी जगातील सर्वात मोठी झोपडपट्टी म्हणून बदनाम झालेले नाव आहे, जगात सर्वात जास्त लोकसंख्या असलेली ही वसाहत आहे. तीन चौरस किमी परिसरात आठ ते दहा लाख लोक वर्षानुवर्षे एखाद्या कोंडवाड्यात जनावरे ठेवावीत असे जीवन जगत आहेत. ऐशी ते शंभर फुटांच्या खोलीत पाच सात लोक कसे राहतात, हे त्यांनाच ठाऊक. तात्पुरत्या पर्यायी धारावीत चक्रव्यूह आहे. तीन ते चार माळ्यांच्या घरांमध्ये प्रत्येक मजल्यावर वेगळे कुटुंब राहते. सार्वजनिक स्वच्छता गृहे कमालीची गलिच्छ आहेत, पाणी मुबलक नाही. पावसाळ्यात गटारे वाहत असतात, त्यावर मोठ्ठमोठे उंदीर, घुशी, घायल असतात, पण झुरळे, किडे, डास यांचे तर साम्राज्य असते. रस्ते, गल्ल्या अरुंद आहेत. अनेक गल्ल्यांतून रिक्षादेखील जाऊ शकत नाहीत. धारावीत महापालिकेचे तीन वॉर्ड आहेत, धारावी हा विधानसभा मतदारसंघ आहे. धारावीत सर्व जातीधर्मांचे सर्व धार्मिक लोक आहेत. पूर्वी ब्रिटिशांच्या काळात कुंभारवाडा म्हणून ही वसाहत प्रसिद्ध होती. नंतर तमिळ लोक मोठ्या संख्येने आले. धारावीत मुस्लीम वस्ती मोठी आहे. जवळपास तीस टक्के मुस्लीम व्होट बँक धारावीत आहेत. पंधरा टक्के लोकसंख्या तमिळ आहे. ख्रिश्चन वस्तीही बऱ्यापैकी आहे. मंदिरे, मशिदी, दर्गे, आणि चर्चसुद्धा आहेत. पोंगल, गणपती, दिवाळी हे सण धारावीत दणक्यात साजरे होत असतात.

धारावीचा नेहमी उल्लेख जगातील मोठी झोपडपट्टी असाच होत राहिला, पण या झोपडपट्टीचे रूपांतर उत्तम वसाहतीत निर्माण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न आजवर कोणत्याच सरकारने केला नाही. धारावीकडे केवळ व्होट बँक म्हणून प्रत्येक राजकीय पक्षाने बघितले. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी झोपडपट्टीवासीयांसाठी मोफत घरांची योजना सुरू केली. त्यातून संपूर्ण मुंबईत चोहोबाजूला झोपडपट्ट्या हटवून उत्तुंग टॉवर्स उभे राहिले, बिल्डर लॉबीचे उखळ पांढरे झाले, स्थानिक राजकारणी, भाई दादा मालामाल झाले. एसआरए योजना हे भ्रष्टाचाराचे कुरण बनले. गेल्या पंचवीस, तीस वर्षांत मोफत घर योजनेखाली अनेकांची चांदी झाली, पण झोपडपट्ट्या व त्यातील रहिवाशांची संख्या कमी झाली का? धारावीची सर्वच राजकीय पक्षांनी उपेक्षा केली. गेल्या वीस वर्षांत धारावीच्या पुनर्विकासाचा सदा वेळा प्रयत्न झाला... आता हे शिवधनुष्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उचलले आहे. धारावीतील लाखोंची रहिवाशांना नरकपुरीतून बाहेर काढून त्यांना हक्काची हवेशीर, मोकळ्या प्रकाश असलेली, पांगणी पक्की घरे या प्रकल्पातून देण्यात येणार आहेत. मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष व माजी मंत्री वर्षा गायकवाड या खासदार म्हणून धारावीचे लोकसभेत प्रतिनिधित्व करतात, त्यांची बहीण डॉ. ज्योती गायकवाड या धारावीच्या काँग्रेसच्या आमदार आहेत. वर्षा व ज्योती यांचे वडील दिवंगत नेते एकनाथ गायकवाड हे खासदार होते, राज्यात मंत्री होते व मुंबई काँग्रेसचे अध्यक्षही होते. धारावीने काँग्रेस व ठाकरेंच्या शिवसेनेला नेहमी झुकते माप दिले आहे. मग या दोन्ही पक्षांनी धारावीतील जीवन राहणीमान सुधारावे यासाठी इतक्या वर्षांत काय प्रयत्न केले? कोविड काळात सर्वात जास्त कोरोनाग्रस्त धारावीत होते. धारावीत कोरोनाने थैमान मांडले होते.





इंडिया कॉलिंग

डॉ. सुकृत खांडेकर

बकाल व गलिच्छपणा, दाट लोकसंख्या नि अरुंद रस्ते या कारणाने धारावी नेहमीच कोणत्या ना कोणत्या आजाराने वेढलेली असते. ताप, टोकेदुखी, अंगदुखी, पेटदुखी, खपरोग, विषमज्वर, डेंगू, हागवण, अन्न आजारांचा धारावीला सतत विळखा पडलेला असतो. ड्रम्पिंग ग्राऊंडवर जाणाऱ्या कचरा गाड्यांच्या धारावीच्या रस्त्यांवर रांग दिसून येतात. कष्ट करून पोट भरणारे व आशेवर जगणारे लोक एकमेकांशी जमवून जीवन जगत असतात. केवळ फुकटच्या शिध्या देऊन किंवा फुकटच्या योजना राबवून धारावी बदलणार नाही, धारावीचा पुनर्विकास करून आमूलाग्र बदल केला पाहिजे हा ध्यास देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे. त्यातूनच धारावीच्या मास्टर प्लॅनला मंजुरी देण्यात आली आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्प हा अदानी समूह आणि महाराष्ट्र सरकार यांचा संयुक्त प्रकल्प आहे. देशातील सर्वात महागडे व्यापारी संकुल म्हणून ओळख असलेल्या बांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स म्हणजेच बीकेसीच्या लगत असणाऱ्या धारावीचा चेहरा-मोहरा बदलणे आणि बकाल-गलिच्छ दहा लाखांच्या लोकवस्तीची स्वच्छ सुंदर आदर्श वसाहत उभारणे हे फार मोठे आव्हान आहे. सन २००० मध्ये हॉलिवुड ब्लॉकबस्टर स्लम डॉग मिलेनियर प्रदर्शित झाला तेव्हा धारावीने सर्व जगाचे लक्ष वेधून घेतले होते, त्यानंतर कोविड १९ काळात सर्वात प्रभावित झालेली वसाहत म्हणून धारावीचे नाव जगात झळकले. नोव्हेंबर २०२२ मध्ये अदानी समूहाने ५०६९ रुपयांची प्रारंभिक गुंतवणुकीसह धारावी झोपडपट्टी पुनर्विकास निविदा जिंकली आणि पुनर्विकास प्रकल्पचा श्रीगणेशा झाला, जानेवारी २०२४ मध्ये धारावी प्रकल्पासाठी आर्किटेक्ट हाकिम कॉन्ट्रक्टर यांच्याबरोबर कंपनीने भागीदारीची घोषणा केली. पुनर्विकास करताना पात्र झोपडपट्टीवासीयांना ३५० चौरस फुटांचा फर्स्ट मिळेल व व्यापारी व व्यावसायिक युनिटसचे पुनर्वसन धारावीतच होणार आहे. धारावी हे आर्थिक शक्तिकेंद्र आहे. येथील पराधसांत लघुउद्योग किंवा कुटिरोद्योग आहेत. चामड्याच्या वस्तूंचे उत्पादन तर देशातच नव्हे तर जगात सर्वत्र जाते. चामड्याच्या व्यवसायातून दरवर्षी एक अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त उत्पन्न धारावीत येत असावे. गामेंट, लेदर, एक्सपोर्टर्स, पॅकिंग, खाद्यपदार्थ, बेकरी अशी उद्योगांनी धारावी भरलेली आहे. अनधिकृत झोपडपट्ट्या व बेकायदेशीर उद्योग-व्यवसायांचे आगर म्हणून धारावी खूप बदनाम आहे. अनेक व्यापार, उद्योग, व्यवसाय करणारे वर्षानुवर्षे खोल्यांचे एक पैसाही भाडे भरत नाहीत. अनेक झोपड्यातील रहिवासी यांना भाडे देणे ठाऊकच नाही. वीज-पाणीही मोफत किंवा चोरून मिळते, मात्र एकदा पुनर्विकास झाला व पक्की खोली मिळाली की मेन्टेनन्स देणे भाग पडेल, वीज-पाण्याची बिले धारावी लागतील, जे अपात्र रहिवासी आहेत त्यांना तर मुंबईत इतरत्र भाड्याची घरे दिली जातील, त्यांना खपूदे फुकट राहता येणार नाही. त्यामुळे आपले पुढे काय होणार याच्या विवंचनेत धारावीतील लोक आहेत. देशाच्या आर्थिक राजधानीत ६२० एकर मौल्यवान जमिनीवर धारावी वसाहत पसरली आहे. पैकी ४७० एक जागेवर पुनर्विकास प्रकल्प उभारला जाणार आहे, प्राप्यक्षात २०० एकरावर प्रकल्प साकारणार आहे. १९० एकरातला पुनर्विकासातून वगळले आहे, त्यात माहीम नेचर पार्क, लोकमान्य टिळक रुग्णालय, शीव- कोळीवाडा आदींचा समावेश आहे. सुमारे एक लाख कोटी खर्चाचा पायाभूत व पुनर्वसन प्रकल्प दोन वर्षांत पूर्ण होईल का? धारावीतील पात्र रहिवाशांसाठी ४१,८३२ घरे, तर व्यापारी व औद्योगिक युनिटससाठी १३,४४८ असे मिळून प्रकल्पात ७२ हजार घरे उभारण्यात येणार आहेत. मुंबई महापालिका निवासी मालत्तेचा पुनर्विकास करण्यासाठी ८७०० युनिटस असतील, या धारावी पुनर्विकास प्रकल्प राबविण्यासाठी अदानी समूहाला मुंबई महापालिकेने मालवणी, देवनार, भांडुप, मुलुंड, कुर्ला येथे ५४२ एकरपेक्षा जास्त जमीन दिली आहे. धारावीतील रहिवाशांचे आमच्याकडे पुनर्वसन नको, म्हणून मुलुंड व अन्य भागांत मोठा विरोध झाला. लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या काळात भाजपचे उमेदवार उपनगरातील एक इंचही जमीन धारावी पुनर्वसनसाठी जाणार नाही, असे ठामपणे सांगत होते. कुर्ला डेअरीची जागा देण्यासही मोठा विरोध झाला पण त्यांचा आवाज मंत्रालयापर्यंत पोहोचलाच नाही. आज मुंबईत धारावी पुनर्विकास प्रकल्पचे फलक झळकू लागले आहेत. आश्वासन देणारे राजकीय नेते घूमजाव बसले आहेत.

धारावीमधील रहिवाशांना विश्वासात न घेता प्रकल्प राबविण्यात येत आहे, हा सर्वात मोठा आक्षेप आहे. धारावी प्रकल्प हा तेथील रहिवाशांसाठी नसून अदानी समूहाच्या हितासाठी आहे हा दुसरा आक्षेप घेतला जातो आहे. मास्टर प्लॅन मंजूर करताना धारावीतील रहिवासी किंवा त्यांची बाजू मांडणारे समोर कोण होते, असा प्रश्न विचारला जातो आहे. सर्वेक्षण पूर्ण झाले नसताना घाईघाईने मास्टर प्लॅन मंजूर झाला कसा, मास्टर प्लॅन मंजूर होण्यापूर्वी नियमानुसार रहिवाशांकडून हरकती, आक्षेप मागवले नाहीत, त्यांची सुनावणी झाली नाही, अपुऱ्या माहितीवर आधारित भूखंडांचे नियोजन झाले असे आक्षेप घेतले जात आहेत. धारावीतील लोकांना हटवून या जागेवर दुसरे बीकेसी उभे राहणार आहे, असे तेथील लोक उघडपणे बोलत आहेत. पण नेमके काय होणार आहे, कोणाला हक्काचे घर धारावीत मिळणार, कुणाला दहा किमी परिसरात घाडझाले मिळणार, कोणत्या व्यापार-व्यवसायांना किती जागा मिळणार, सर्वेक्षण कधी पूर्ण होणार, पुनर्विकासाच्या कामाला सुरवात कधी होणार हे रहिवाशांना कोणी समजावून सांगणारे नाही. विरोधी पक्षांचे मोर्चे निघाले व पुढेही निघतील पण पुढे काहीच घडत नाही हे रहिवाशांना कळून चुकले आहे. धारावीचा पुनर्विकास झाला पाहिजेच पण त्याविषयी धारावीत खूप अज्ञान आहे.

sukritforyou@gmail.com
sukrit@prahaar.co.in

The Maharashtra government approved Dharavi's redevelopment master plan, promising improved housing with bathrooms, wider roads, and better facilities. The Adani Group partners in this project to transform Dharavi from a congested slum into a modern settlement, preserving livelihoods while enhancing living conditions for its million residents.

Prahar • 04 Jun • Dharavi

Kurla Dairy site for Dharavi project

1 • PG | 86 • Sqcm | 24092 • AVE | 215K • Cir | Middle Right

Mumbai



धारावी प्रकल्पासाठी कुर्ला डेअरीची जागा

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय मंगळवारी घेण्यात आले आहेत. यात प्रामुख्याने महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना, धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी जमीन हस्तांतरण, राज्य कामगार विमा महामंडळासाठी रुग्णालयांना जमीन आणि एमएसआरडीसीला पथकराच्या सवलतीसाठी भरपाई देण्याचा निर्णय घेण्यात आला.

धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी कुर्ला येथील दुग्ध व्यवसाय विकास विभागाची ८.५ हेक्टर जमीन हस्तांतरित करण्यासाठी करारनाम्यातील अटी, शर्तींमध्ये सुधारणांना मान्यता दिली आहे. याबाबतचा निर्णय मंगळवारी

अनुसूचित जमाती आयोग स्थापनेचा मंत्रिमंडळ निर्णय

(दि. ३ जून) राज्य मंत्रिमंडळाने घेतला. धारावीच्या पुनर्विकासाचा मार्ग आता अधिक सुकर झाला असून या जमिनीच्या हस्तांतरणासाठी करारामध्ये काही बदल करण्यात आले आहेत.

महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जमातींसाठी स्वतंत्र आयोग स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. 'महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग' असे या आयोगाचे नाव असेल. या आयोगासाठी आवश्यक पदे निर्माण केली जातील. तसेच कार्यालयीन जागा आणि इतर खर्चांना देखील मान्यता देण्यात आली आहे. 'महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग सुद्धा स्वतंत्रपणे कार्यरत राहणार,' असेही शासनाने स्पष्ट केले आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्प ९५,७९० कोटी रुपये खर्चून राबवला जाणार आहे. या खर्चात विस्थापित होणाऱ्या धारावीकरांसाठी बांधल्या जाणाऱ्या घरांच्या खर्चाचा समावेश आहे. हा प्रकल्प

मंत्रिमंडळातील अन्य महत्त्वाचे निर्णय

- **महसूल विभाग :** राज्य कामगार विमा महामंडळाच्या दोनशे खाटांच्या विमा कामगार रुग्णालय उभारणीसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील मौजे करोडी येथील सहा हेक्टर शासकीय जमीन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
- **विकासवाडी - पुणे, अहिल्यानगर, सांगली अमरावती, बल्लारपूर-चंद्रपूर, सिन्नर - नाशिक, बारामती, सातारा आणि पनवेल येथील** रुग्णालयांना जमीन देण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली आहे.
- **सार्वजनिक बांधकाम विभाग :** महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास पथकराच्या सवलतीसाठी भरपाई मिळणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला पथकराच्या सवलतीमुळे होणारे नुकसान भरून मिळणार आहे. मुंबईच्या प्रवेशद्वारावरील पाच टोल नाक्यांवर सवलत देण्यात आली आहे. त्यामुळे एमएसआरडीसीला जो आर्थिक भार येणार आहे, त्याची भरपाई शासन करणार आहे. मुंबई प्रवेशद्वाराच्या पाच पथकर स्थानकावर सवलत दिल्यानुसे महामंडळास द्यावी लागणारी भरपाई, असे शासनाने म्हटले आहे.

दोन वर्षांच्या पुढे गेल्यास जास्तीचा बांधकाम खर्च २३ हजार ८०० कोटी रुपये गृहीत धरण्यात आला आहे.

अनुसूचित जमातीसाठी वेगळे महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतल्याचे पडसाद महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात उमटले आहेत. अनुसूचित जमातीच्या लोकांनी या निर्णयाचे स्वागत करताना फडणवीस सरकारचे आभार मानले आहेत.

The Maharashtra government approved transferring 1.5 hectares of Kurla Dairy land for the Dharavi redevelopment project, easing redevelopment. It also decided to form a separate State Scheduled Tribes Commission and compensate the MSRDC for tax exemptions. Additional land was allocated for labor insurance hospitals, benefiting tribal communities and infrastructure.

Prahar • 04 Jun • Dharavi

Opposition to tree felling for Dharavi redevelopment project

7 • PG | 33 • Sqcm | 9192 • AVE | 215K • Cir | Middle Left

Mumbai



धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी वृक्षतोडीला विरोध

मुंबई : धारावी पुनर्विकास प्रकल्पअंतर्गत तेथील १०० झाडांवर कुऱ्हाड चालविण्यात येणार आहे. या निर्णयाला नागरिकांकडून तीव्र विरोध होऊ लागला आहे. तसेच, प्रस्तावित वृक्षतोडीचा निर्णय शासनाने मागे घेऊन संबंधित जागेवर उद्यान उभारण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. याबाबत लवकरच न्यायालयात याचिका दाखल करण्यात येणार आहे. मदर डेअरीची जागा आता धारावी पुनर्विकास प्रकल्पाला देण्यात आल्यामुळे नागरिकांमध्ये असंतोष पसरला आहे. तसेच, या प्रकल्पासाठी परिसरातील १०० झाडे कापण्याचे प्रस्तावित असून या वृक्षतोडीला नागरिकांकडून विरोधात होत आहे. संबंधित जागेतील झाडांचा हिरवळीचा भाग सोडल्यास सगळीकडे इमारती उभ्या राहिल्या आहेत. त्यामुळे शासनाने प्रस्तावित वृक्षतोडीचा निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी स्थानिक रहिवाशांकडून करण्यात येत आहेत.

Under the Dharavi redevelopment project, plans to cut three trees at Mother Dairy's site have sparked strong opposition from local citizens. They demand the government withdraw the tree-cutting decision and instead develop a park. A court petition is being prepared, reflecting residents' concerns over environmental impact amid growing construction.

Sakal • 04 Jun • Dharavi

Dairy land for Dharavi project

1 • PG	66 • Sqcm	43240 • AVE	352.42K • Cir	Middle Center

Mumbai



दुग्धशाळेची जमीन धारावी प्रकल्पाला

मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी दुग्धव्यवसाय विकास विभागाची कुर्ला येथील साडेआठ हेक्टर जमीन हस्तांतरित करण्यासाठी करारनाम्यातील अटी, शर्तींमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या कुर्ला येथील मातृ दुग्धशाळेची जमीन धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी जून २०२४च्या शासन निर्णयानुसार देण्यात आली आहे. ही जमीन काही अटी व शर्तींवर धारावी पुनर्विकास प्रकल्प-झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला देण्यात आली आहे. करारनाम्यातील अटी व शर्ती गृहनिर्माण आणि नगरविकास विभागाच्या धोरणाशी सुसंगत असाव्यात यासाठी यात सुधारणा करण्यात आल्या आहेत. यामुळे धारावीतील रहिवाशांना जास्तीत जास्त घरे उपलब्ध होऊ शकणार आहेत. धारावी पुनर्विकासात साडेआठ लाख कुटुंबांचे पुनर्वसन करावे लागणार आहे. यापैकी पाच लाख पात्र कुटुंबांचे पुनर्वसन धारावी परिसरात होणार आहे. उर्वरित साडेतीन लाख कुटुंबांचे पुनर्वसन करण्यासाठी अधिकची जमीन आवश्यक होती. या निर्णयामुळे धारावीतील अपात्र नागरिकांच्या पुनर्वसनाचा मार्ग मोकळा होणार आहे.

The Cabinet improved contract terms to transfer Kurla's Mother Dairy land to Dharavi redevelopment, aligning with Housing Department policies. The project aims to rehabilitate 1.5 lakh families, including five lakh eligible ones, and seeks more land to accommodate the remaining 3.5 lakh ineligible Dharavi residents.

Sakal • 04 Jun • Dharavi

Government ignores MHADA's demand

1 • PG | 138 • Sqcm | 91232 • AVE | 352.42K • Cir | Bottom Right

Mumbai



म्हाडाच्या मागणीला सरकारची बगल

धारावीतील इमारत हस्तांतर प्रकरणात कोंडी

व्याजाच्या रकमेवर पाणी

डीआरपी आणि एनएमडीपीएल सुरुवातीपासून म्हाडाच्या इमारतींचा बांधकाम खर्च देण्यास तयार आहे; मात्र व्याजाची रक्कम माफ करावी, अशी मागणी केली जात आहे. त्यातच आता सरकारने व्याजाच्या रकमेचे नंतर बघू, असे सांगितल्याने ती रक्कम म्हाडाला भविष्यात मिळणार की पाणी सोडावे लागणार, अशी चिंता वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

मुंबई, ता. ३ : धारावी शताब्दीनगरमध्ये म्हाडाच्या पाच इमारती असून, धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत त्या राज्य सरकारच्या 'डीआरपी' आणि अदाणीच्या 'एनएमडीपीएल'कडे हस्तांतरित कराव्या लागणार आहेत; मात्र या इमारतींच्या बदल्यात संबंधित कंपन्यांनी बांधकामावर झालेला सुमारे ४५८ कोटी रुपयांचा खर्च आणि त्या रकमेवरील व्याजापोटी १८३ कोटी रुपये असे एकूण ६४१ कोटी रुपये द्यावे, अशी म्हाडाची मागणी आहे. मात्र, राज्य सरकारने त्याला बगल दिली असून बांधकाम खर्चाची रक्कम घेऊन इमारतींचा ताबा डीआरपी आणि एनएमडीपीएलला द्यावा, व्याजाचे नंतर बघू, असे बजावले आहे. त्यामुळे म्हाडाची मोठी कोंडी झाली आहे.

धारावी पुनर्विकास प्रकल्पाचा भाग म्हणून म्हाडाने या पाच इमारती उभारल्या होत्या. म्हाडाने या इमारतींच्या उभारणीवर केलेला खर्च आणि खर्चाच्या रकमेवरील व्याज असे ६४१ कोटी रुपये द्या, त्यानंतरच इमारतींचा ताबा दिला जाईल, अशी भूमिका घेतली होती. नुकतीच मुख्यमंत्र्यांच्या वॉर रूममध्ये याबाबत बैठक पार पडली. त्यामध्ये इमारतीच्या उभारणीवर झालेल्या मूळ खर्चाची रक्कम घेऊन इमारतींचा ताबा द्यावा, असे सांगितले आहे. त्यानुसार म्हाडानेही डीआरपीला पत्र पाठवत बांधकाम खर्चाची रक्कम देण्याबाबत कळवले आहे. म्हाडा आता बॅकफूटवर का, असा सवाल म्हाडाच्या अधिकाऱ्यांकडून केला जात आहे.

MHADA built five Dharavi redevelopment buildings but demands ₹2 crore construction costs plus ₹5 crore interest from DRP and NMDPL. The government wants interest waived, causing concern among officials about future repayments. MHADA insists on payments, creating tension despite a recent meeting to resolve the issue.

Jagruk Times • 04 Jun • Dharavi

Dharavi Redevelopment: ^Mini Marine Drive^ along Mithi River

3 • PG	299 • Sqcm	188298 • AVE	993.74K • Cir	Bottom Center

Mumbai



धारावी पुनर्विकास: मीठी नदी किनारे "मिनी मरीन ड्राइव"

सुरेश पाड़ीव/जागरूक टाइम्स

मुंबई। कभी मुंबई के सबसे घने और जटिल बस्तियों में शुमार धारावी अब सिर्फ पुनर्विकास की योजना नहीं, बल्कि भविष्य की वैश्विक महानगरी की परिकल्पना बन चुकी है। धारावी पुनर्विकास परियोजना के मास्टर प्लान में जो नया चेहरा उभर रहा है, वह केवल इमारतों या मूलभूत ढांचे का विस्तार नहीं, बल्कि मुंबई को शंघाई जैसी स्मार्ट, सुव्यवस्थित और सुंदर नगरी में बदलने की दिशा में एक निर्णायक पहल है। इस परियोजना की सबसे आकर्षक विशेषता है मीठी नदी के किनारे प्रस्तावित विशाल वाटरफ्रंट, जो आकार में मरीन ड्राइव के बाद शहर का दूसरा सबसे बड़ा सार्वजनिक सैरगाह बनने जा रहा है। यह 'मिनी मरीन ड्राइव' न केवल धारावी की छवि को पूरी तरह बदल देगा, बल्कि दक्षिण मुंबई की प्रतिष्ठित छवि को उत्तर मुंबई तक विस्तार देगा। लोगों को यहां सैर करते हुए उत्तर दिशा में फैले हुए मैंग्रोव वनों की हरियाली और ताजगी का भी अनुभव मिलेगा। एक ऐसा दृश्य जो अब तक धारावी से कोसों दूर समझा जाता था।

धारावी अब अतीत नहीं, भविष्य की पहचान बनेगा

यह योजना सिर्फ एक झुग्गी क्षेत्र का पुनर्विकास नहीं है, बल्कि धारावी को "मुंबई का दिल" बनाकर उसे एक सांस्कृतिक, पर्यावरणीय और ट्रांजिट हब के रूप में स्थापित करने का प्रयास है।जैसे शंघाई में पुराने औद्योगिक क्षेत्रों को अत्याधुनिक मेट्रोपॉलिटन हब में बदला गया, ठीक उसी राह पर अब मुंबई भी चल पड़ी है। मुंबई को शंघाई बनाने की यह कोशिश तभी सफल मानी जाएगी जब विकास केवल ईंट और सीमेंट तक सीमित न रहे, बल्कि लोगों की आवश्यकताओं, जीवन की गुणवत्ता और हरित वातावरण को समान महत्व दिया जाए और इस दृष्टि से देखा जाए तो धारावी पुनर्विकास योजना वाकई मुंबई के आधुनिक भविष्य का नक्शा प्रतीत होती है।

▸▸ मुंबई को शंघाई जैसी वैश्विक पहचान दिलाने की ओर बड़ा कदम

▸▸ 'विकास' की धमनियों जैसा सड़क नेटवर्क

सड़क ढांचे को भी पूरी तरह आधुनिक बनाया गया है। योजना के अनुसार लगभग 21 किलोमीटर का नया सड़क नेटवर्क तैयार किया जाएगा जिसमें 9 से लेकर 36 मीटर चौड़ी सड़कें शामिल होंगी। इन सड़कों का निर्माण इस तरह किया जाएगा कि हर 125 मीटर पर उनका आपस में जुड़ाव हो, जिससे आवागमन आसान और समय की बचत संभव हो सके। यह नेटवर्क शंघाई के शहरी लेआउट की याद दिलाता है, जहां ट्रैफिक जाम को दूर करने के लिए सड़कों को बहुस्तरीय और आपस में जुड़ा हुआ डिजाइन किया गया है।

▸▸ मल्टीमॉडल ट्रांजिट हब : मुंबई की रफ्तार को नए पंख

धारावी के मध्य एक अत्याधुनिक मल्टीमॉडल ट्रांजिट हब प्रस्तावित है, जो मेट्रो, रेलवे, बस सेवा, फीडर ट्रांसपोर्ट और नॉन-मोटराइज्ड ट्रैफिक को जोड़ता है। इस हब से लोग सीधे शहर के अन्य हिस्सों, यहां तक कि एयरपोर्ट तक कुशलता से पहुंच सकेंगे। कल्पना कीजिए कि एक यात्री धारावी में मेट्रो से उतरकर वहीं से अपनी फ्लाइट के लिए बैग चेक-इन करता है और हब में मौजूद कैफे, को-वर्किंग स्पेस या बुक कैफे में अपना समय बिताता है। यह सुविधा अब तक केवल अंतरराष्ट्रीय शहरों में ही देखने को मिलती है।

▸▸ ग्रीन स्पाइन : पर्यावरण की आत्मा, शहर के केंद्र में

माहिम नेचर पार्क से लेकर रेलवे डेवलपमेंट जोन तक प्रस्तावित 'ग्रीन स्पाइन' इस पूरी योजना की पर्यावरणीय आत्मा होगी। यह न केवल दोनों ओर सड़कों से घिरा हरित कॉरिडोर होगा, बल्कि एक जैव विविधता युक्त breathing zone के रूप में काम करेगा। एक ऐसा हरित क्षेत्र जो शंघाई के ग्रीन बेल्ट मॉडल की तरह लोगों के शहरी जीवन में संतुलन और स्वास्थ्य लेकर आएगा।

The Dharavi redevelopment envisions a “Mini Marine Drive” waterfront, transforming Dharavi into a smart, green, and cultural hub like Shanghai. It includes a 21 km modern road network, a state-of-the-art transit hub, and a “Green Spine” corridor, aiming to boost Mumbai’s global identity and improve residents’ quality of life.

Navbharat • 04 Jun • Dharavi

Paving the way for rehabilitation of Dharavi

1 • PG | 339 • Sqcm | 254394 • AVE | 675K • Cir | Top Left | Mumbai Plus

Mumbai

धारावी के पुनर्वसन का रास्ता साफ

कुर्ला की मदर डेयरी की जमीन धारावी प्रोजेक्ट को मिली



■ मुंबई, नवभारत न्यूज नेटवर्क. लगभग 600 एकड़ में फैली एवं 10 लाख की आबादी वाली एशिया की सबसे बड़ी झुग्गी बस्ती धारावी के पुनर्वसन का रास्ता अब साफ हो गया है. धारावी के पुनर्वसन लिए कटिबद्ध नजर आ रही महाराष्ट्र की महायुति सरकार तमाम विरोधों को दरकिनार करते हुए कुर्ला में स्थित मदर डेयरी (डेयरी विकास विभाग) की 8.5 हेक्टेयर जमीन धारावी पुनर्विकास परियोजना के लिए हस्तांतरित करेगी. इसके लिए पूर्व निर्धारित समझौते की शर्तों में सरकार संशोधन करेगी. मंगलवार को मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस की अध्यक्षता में सह्याद्री गेस्ट हाउस में हुई राज्य कैबिनेट की बैठक में संशोधन करने के निर्णय को मंजूरी मिल गई है. सरकारी ज्ञापन दिनांक 14 जून 2024 के अनुसार, डेयरी विकास विभाग की कुर्ला स्थित मदर डेयरी की भूमि धारावी पुनर्विकास परियोजना के लिए प्रदान की गई है. इस परियोजना के नियोजन प्राधिकरण के रूप में, यह भूमि धारावी पुनर्विकास परियोजना-झोपड़ी पुनर्वास प्राधिकरण को कुछ शर्तों पर प्रदान की गई है. इस परियोजना के कार्यान्वयन को सुविधाजनक बनाने के लिए, इस ज्ञापन में नियम और शर्तों और मुंबई उपनगर के जिला कलेक्टर के मसौदा समझौते को आवास और शहरी विकास विभाग की नीति के अनुरूप बनाने के लिए मंजूरी दी गई. ताकि धारावी के निवासियों के पुनर्वास के लिए अधिकतम घर उपलब्ध हो सके.



हरा-भरा इलाका, जहां 1,000 से ज्यादा बहुमूल्य पेड़

नेहरू नगर स्थित मदर डेयरी की जमीन धारावी पुनर्विकास परियोजना के लिए दिए जाने का स्थानीय लोग भारी विरोध कर रहे हैं. पर फडणवीस कैबिनेट ने पीएम के दोस्त के हित में सौंपने का मार्ग और आसान बना दिया. यह हरा-भरा इलाका- जिसमें 1,000 से ज्यादा बहुमूल्य पेड़ हैं. पर्यावरण के लिहाज से बेहद अहम है. नेहरू नगर के निवासियों ने पेड़ों को संरक्षित करने और जमीन को सार्वजनिक उद्यान के तौर पर आरक्षित करने की मांग करते हुए एक बड़ा जन आंदोलन शुरू किया है. सरकार अदाणी के लालच को पूरा करने के लिए इस हरे-भरे इलाके को बेरहमी से नष्ट करना चाहती है. जनता की भावनाओं और पर्यावरण संबंधी चिंताओं की अनदेखी करते हुए इसने पहले अदाणी के हित के लिए जबरन जमीन आवंटित की. जब @INCIndia स्थानीय नागरिक विरोध में सड़कों पर उतरे, तो सरकार ने पुलिस बल का इस्तेमाल किया. एक और कदम जो अदाणी को लाभ पहुंचाता है. यह अदाणी द्वारा बनाई गई सरकार है, जो लाभ के लिए मुंबईकरों के अधिकार, भूमि और भविष्य को बेचने के लिए तैयार है.



-वर्षा गायकवाड
सांसद व मुंबई प्रदेश अध्यक्ष, कांग्रेस

ज्यादा घर उपलब्ध कराना लक्ष्य

धारावी पुनर्विकास में साढ़े आठ लाख परिवारों का पुनर्वास किया जाना है. इनमें से पांच लाख पात्र परिवारों का पुनर्वास धारावी क्षेत्र में किया जाएगा. शेष साढ़े तीन लाख परिवारों के पुनर्वास के लिए अधिक भूमि की आवश्यकता है. कुर्ला में भूमि उपलब्ध होने से कुछ और परिवारों का पुनर्वास करना आसान हो जाएगा. मंगलवार को लिए गए कैबिनेट के निर्णय से धारावी में अपात्र नागरिकों के पुनर्वास का मार्ग प्रशस्त होगा. सभी के लिए आवास की नीति का पालन करने में यह निर्णय बहुत महत्वपूर्ण है और इससे न केवल घरों के निर्माण में सुविधा होगी, बल्कि स्कूल, अस्पताल, शॉपिंग कॉम्प्लेक्स जैसी अन्य नागरिक सुविधाएं भी उपलब्ध हों.

पास हो चुका है मास्टर प्लान

धारावी पुनर्विकास परियोजना (डीआरपी) का मास्टर प्लान राज्य सरकार ने मंजूर किया है. यह परियोजना क्लस्टर-आधारित विकास तकनीकी पर केंद्रित है, जिसमें कॉम्पैक्ट पड़ोस होंगे. प्रत्येक क्लस्टर में आवासीय, वाणिज्यिक और सामाजिक सुविधाएं पैदल दूरी पर होंगी. इसमें खेल के मैदान, बच्चों के लिए स्थान, खुले क्षेत्र और छोटे उद्योगों के लिए सुविधाएं शामिल होंगी. धारावी की गलियां क्लस्टर बेस्ड विकास से दुरुस्त होंगी. प्लान में 21 किमी का नया सड़क नेटवर्क प्रस्तावित है, जिसमें हर 125 मीटर पर 9 से 36 मीटर चौड़ी सड़कें होंगी. मल्टी-मॉडल ट्रांजिट हब (एमएमटीएच) मेट्रो, ट्रेन, बस और गैर-मोटर चालित परिवहन को जोड़ेगा. हब में कार्यालय, दुकानें, रेस्तरां और होटल होंगे, जहां यात्री उड़ानों के लिए चेक-इन और सामान जमा कर सकेंगे. औद्योगिक इकाइयों को नई परियोजना में स्थान मिलेगा.


Dabang Duniya • 04 Jun • Dharavi


The current master plan of DRP is not acceptable to the Dharavikar

2 • PG | 614 • Sqcm | 657518 • AVE | 605K • Cir | Top Left
Mumbai

धाराविकारों को डीआरपी का मौजूदा मास्टर प्लान मंजूर नहीं?

शक के दायरे में डीआरपी और एनबीएमडी के मुखिया





दबंग रिपोर्टर » मुंबई

धारावी रीडिवेलपमेंट का मास्टर प्लान डीआरपी के सी.ई.ओ. एस वी आर श्रीनिवास कि ओर से फाइनल किया गया है, जो कि धाराविकारों को मंजूर नहीं है। बता दें कि श्रीनिवास धारावी पुनर्विकास प्रोजेक्ट के सी.ई.ओ. और नवभारत मेगा डेवलपर्स प्राइवेट लिमिटेड (एनबीएमडी) के चेयरमैन भी हैं। यह कंपनी इस प्रोजेक्ट को पूरा करने के लिए बनाई गई है। इस प्रोजेक्ट में 80 फीसदी भागीदारी अडानी ग्रुप की और 20 फीसदी हिस्सेदारी महाराष्ट्र सरकार की है। हालांकि इस प्रोजेक्ट का विरोध चल रहा है। खुद धारावी के लोग इस पुनर्विकास परियोजना के खिलाफ हैं। ऐसा इसलिए क्योंकि रीडिवेलपमेंट में सिर्फ उन लोगों को ही घर दिए जाने की तैयारी है जो ग्राउंड फ्लोर पर रहते हैं। बाकी लोगों को धारावी से बाहर भेजा जा सकता है ' वहीं लगभग 600 एकड़ में फैले धारावी का विकास की रह देखते -देखते लाखों धाराविकर भगवन को प्यारे हो गए। इसके बाद भी रीडिवेलपमेंट का काम अधर में लटका है।

धाराविकारों के सहयोग में उतरे सांसद और विधायक

गौरतलब है कि धारावी के रीडिवेलपमेंट से संबंधित मास्टर प्लान अभी मुख्यमंत्री मुख्यमंत्री फडणवीस और उपमुख्यमंत्री सह गृह निर्माण मंत्री एकनाथ शिदि को सौंपी गई है। मौके की नजाकत को देखते हुए धाराविकारों ने अपनी मांगों को और जोरदार तरीके से उठाया है। इस कड़ी में दिलचस्प बात यह है कि धारावी के आंदोलनकारियों के साथ स्थानीय सांसद अनिल देसाई और विधायक ज्योति गायकवाड़ का साथ मिल रहा है। हालांकि धारावी पुनर्विकास के मास्टर प्लान की एक कॉपी अध्यन के किये धारावी बचाव आंदोलन के नेताओं को उपलब्ध कराया गया था, ताकि इस प्लान का फायदा और क्या नुकसान पर विचार करें।

आंदोलनकारियों ने दी उग्र आंदोलन के चेतावनी

धारावी के इस मास्टर प्लान को सिरे से नकार दिया और मांग किया है कि जो भी मास्टर प्लान DRP बनाए उसमें धारावी के रहवासियों का सुझाव और विरोध दर्ज किया जाए, नहीं तो इस मास्टर प्लान के विरोध में उग्र आंदोलन किया जायेगा। इसमें सभी धारावीकर शामिल होंगे। आंदोलनकारी नेताओं का कहना है कि किसी बड़े साजिश के तहत धारावीकरों को देवनार डंपिंग ग्राउंड पर भेजने की तैयारी चल रही है, जहां विभिन्न प्रकार की बिमारियों से नागरिक त्रस्त हैं। इसके अलावा मीठागर, जहां समुद्र का पानी भरना, पर्यावरण को होने वाले नुकसान या रेल्वे की जमीन जो लीज पर ली गई है जिस पर कुछ पात्र धारावीकरों को बसने की योजना है। ऐसे में रेल्वे कभी भी हटा सकती है, क्योंकि वह रेल्वे की सरप्लस जमीन नहीं है। वह जमीन रेल्वे की ऑपरेशनल जमीन है, जिसे बेचा नहीं जा सकता। अगर रेल्वे को विस्तारित करना होगा तो वहां बने बिल्डिंग को हटाया जाएगा और धारावीकर को फिर से उजाड़ दिया जाएगा। ऐसे मुद्दों पर धारावी बचाव आंदोलन कोर्ट भी जाने की तैयारी कर रही है।

धाराविकारों के साथ पत्र अपात्र का खेल शुरू

एक अन्य जानकारी के अनुसार धारावी के लोगों को अपात्र कर देवनार डंपिंग ग्राउंड और धारावी से बाहर मुंबई के अन्य स्थानों पर ली गई जमीन जिसे धारावी नोटिफाइड एरिया कहते हैं। इसके अलावा पात्र लोगों को लीज पर ली गई रेल्वे की जमीन पर दूंस दूंस कर बसाने वाल मास्टर प्लान बनाया गया है। इस प्लान के पीछे की खानी चौंकाने वाली है, बता दें कि माटुंगा और माहिम का अधिकांश हिस्सा रेल्वे से लगा हुआ है, वहीं धारावीकरों के लिए, बीकेसी से लगा हुआ 60 फिट रोड, 90 फिट रोड, सायन रेल्वे स्टेशन एलबीएस रोड, सायन बांद्रा लिंक रोड के इलाके की सभी जमीन अदानी को बेचा गया है। इस एरिया में कुम्हारवाडा से नाईक नगर, टी जंक्शन से लेकर सायन स्टेशन, 60 फिट रोड के अंदर का धारावी सभी अदानी को दे दिया गया है। धारावी का व्यवसायी और उद्योग कहां जायेगा। इसकी कोई जानकारी उक्त मास्टर प्लान में नहीं है। ऐसे में माना जा रहा है कि धारावी पुनर्विकास प्रोजेक्ट और डेवलपर्स प्राइवेट लिमिटेड के महामहिम श्रीनिवास की भूमिका शक के दायरे में है।


Hamara Mahanagar • 04 Jun • Dharavi
Glimpses

3 • PG	203 • Sqcm	166762 • AVE	585K • Cir	Top Center

Mumbai

धारावी के अपात्र नागरिकों के पुनर्वास का मार्ग प्रशस्त

- जमीन हस्तांतरण की शर्तों में संशोधन
- मंत्रिमंडल की बैठक में लिया गया निर्णय



महानगर संवाददाता

मुंबई

मंगलवार को हुई राज्य कैबिनेट की बैठक में कई महत्वपूर्ण निर्णय लिए गए। बैठक में कुर्ला स्थित डेयरी विकास विभाग की 8.5 हेक्टेयर भूमि धारावी पुनर्विकास परियोजना को देने के लिए समझौते की शर्तों में संशोधन को मंजूरी प्रदान की गई। कैबिनेट के निर्णय से धारावी के अपात्र नागरिकों के पुनर्वास का मार्ग प्रशस्त होगा। धारावी पुनर्विकास में साढ़े आठ लाख परिवारों का पुनर्वास किया जाना है। इनमें से पांच लाख पात्र परिवारों का पुनर्वास धारावी में ही किया जाएगा, जबकि शेष साढ़े तीन लाख परिवारों के पुनर्वास के लिए अधिक जमीन की आवश्यकता है।

कुर्ला स्थित मदर डेयरी की जमीन 14 जून 2024 के सरकारी ज्ञापन के अनुसार धारावी पुनर्विकास परियोजना के लिए प्रदान की गई है। यह जमीन कुछ शर्तों के साथ पुनर्विकास परियोजना-झोपड़ी पुनर्वास प्राधिकरण को दी गई है। परियोजना के क्रियान्वयन को आसान बनाने के लिए ज्ञापन में दी गई शर्तों और मुंबई उपनगर के जिला कलेक्टर के मसौदा समझौते को आवास और शहरी विकास विभाग की नीति के अनुरूप बनाने को मंजूरी दी गई है, ताकि धारावी के निवासियों के पुनर्वास के लिए अधिक से अधिक घर उपलब्ध कराए जा सकें। कुर्ला में भूमि उपलब्ध होने से कुछ और परिवारों का पुनर्वास करना आसान हो जाएगा। कैबिनेट के निर्णय से धारावी के अपात्र नागरिकों के पुनर्वास का मार्ग प्रशस्त होगा।

अडानी को जमीन देने का विरोध

इधर सांसद और मुंबई कांग्रेस अध्यक्ष वर्षा गायकवाड ने आरोप लगाया कि स्थानीय लोगों के विरोध के बावजूद कुर्ला स्थित मदर डेयरी की जमीन अडानी को दे दी गई। उन्होंने कहा कि मुंबई की सरकारी जगह 25 फीसदी की दर से अडानी को दी जा रही है। उन्होंने चेतावनी दी कि मदर डेयरी की जमीन अडानी को दिए जाने के सरकार के फैसले का कांग्रेस पार्टी और कुर्ला के नागरिकों द्वारा विरोध जारी रहेगा।

वर्षा गायकवाड ने कहा कि यह कुर्ला मदर डेयरी की भूखंड मौके की जगह पर है। यहां सैकड़ों पेड़ हैं। स्थानीय लोगों की मांग है कि यहां पार्क बनाया जाए, लेकिन भाजपा ये जगह अडानी को दे दी।

Pudhari • 04 Jun • Dharavi

Way open to giving Kurla Dairy land for Dharavi

1,2 • PG | 136 • Sqcm | 122557 • AVE | 347.1K • Cir | Middle Right,Top Left

Mumbai

कुर्ला डेअरीची जमीन धारावीसाठी देण्याचा मार्ग खुला

हस्तांतरण अटी बदलल्या

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी दुग्ध व्यवसाय विकास विभागाची कुर्ला येथील ८.५ हेक्टर जमीन हस्तांतरित करण्यासाठी करारनाम्यातील अटी, शर्तींमध्ये सुधारणा करण्यास मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

मंत्रिमंडळाने कुर्ल्यातील मदर डेअरीची जागा धारावी प्रकल्पाला देण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले आहे. सरकारच्या या निर्णयावरून विरोधक आक्रमक होण्याची शक्यता आहे.

दुग्ध व्यवसाय विकास विभागाची कुर्ला येथील मातृदुग्धशाळेची जमीन धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी १४ जून २०२४ च्या शासन आदेशानुसार देण्यात आली आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्प राबविणे अधिक सुलभ व्हावे, यासाठी शासन आदेश आणि जिल्हाधिकारी (मुंबई उपनगर) यांच्या मसुदा करारनाम्यातील अटी व शर्ती गृहनिर्माण आणि नगरविकास विभागाच्या धोरणाशी सुसंगत

/...२

कुर्ला डेअरीची जमीन धारावीसाठी देणार

करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता देण्यात आली.

धारावी पुनर्विकासात साडे आठ लाख कुटुंबांचे पुनर्वसन करावे लागणार आहे. यापैकी पाच लाख पात्र कुटुंबाचेच पुनर्वसन धारावीत होणार असून उर्वरित साडे तीन लाख कुटुंबांचे पुनर्वसन करण्यासाठी मुंबईत इतरत्र जमीनी दिल्या जात आहेत. आतापर्यंत आक्सा- मालवणी (१४० एकर), देवनार (१२४.३ एकर), सॉल्ट पॅन भांडूप (७६.९एकर), सॉल्ट पॅन मुलुंड (५८.५ एकर) येथील जमीनी धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी देण्यात आल्या. यातील आक्सा मालवणीतील जमीनीचे हस्तांतरण आता बाकी आहे. धारावी अपात्र ठरणाऱ्या रहिवाशांची संख्या सर्वेक्षणानंतरच निश्चित होईल. मात्र तुर्तास ही संख्या साडेतीन लाख सांगितली जाते. या रहिवाशांसाठी तब्बल ४२०.७ एकर जमीन मुंबईच्या विविध भागांत दिली जात असून त्यात कुर्ल्यातील डेअरीची २१ एकर जागाही समाविष्ट आहे. अर्थात धारावीच्या अपात्र रहिवाशांसाठी इथे हक्काची नव्हे तर परवडणाऱ्या भाड्याची घरे बांधली जाणार आहे.

